तरुण भारत संवाद
मंगळवार २३ जुलै २०२४

# शुभम जाधवची राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर



विवेकानंद कॉलेजमध्ये बी. ए. भाग एकमधील शुभम जाधव याची सेकंड हॉकी इंडिया वेस्ट झोन चॅम्पियनशीप स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा छत्तीसगड येथे २१ ते २८ जुलै दरम्यान होणार आहे. पुणे येथे झालेल्या निवड चाचणीमध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्हयातून आलेल्या ८० खेळाडूमधून त्याची निवड झालेली आहे. शुभम जाधव याला प्रशिक्षक सागर जाधव व योगेश देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. शुभमच्या या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. त्याला जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समिर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, सुरेश चरापले यांचे प्रोत्साहन मिळाले.

23/07/2024
23/7/24